# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 18.03.2024** **वारः सोमवार**

---

1. देशात विविध पक्षांच्या राजकीय प्रचाराला सुरुवात
2. निवडणूक रोखेसंदर्भातील माहिती, निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित.
3. रशियाच्या अध्यक्षपदी व्लादिमिर पुतीन यांची निवड. सलग पाचव्यांदा निवडणूक जिंकण्याचा विक्रम
4. भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचं भव्य दर्शन घडवणाऱ्या स्टार्टअप महाकुंभला दिल्लीमध्ये आजपासून सुरुवात.

आणि

5. महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अजिंक्य.

**<u>प्रचार</u>**

निवडणूक आयोगाने निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून विविध राजकीय पक्षांचा प्रचार सुरू झाला आहे. त्याचबरोबर निवडणुकीची आचारसंहिता देखील लागू झाली आहे. आंध्र प्रदेशातील पालनाडू जिल्ह्यात काल राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या पहिल्या प्रचार सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी – एनडीए, प्रादेशिक आकांक्षा आणि राष्ट्रविकास या गोष्टींसह पुढे जात असल्याचं त्यांनी सांगितलं. “विकसित भारतासाठी विकसित आंध्र प्रदेश तयार करणे हे आपलं उद्दिष्ट आहे. आंध्र प्रदेशात एनडीएचं डबल इंजिन सरकार आल्यामुळे इथल्या विकासाला आणखी गती मिळेल”, असं मोदी म्हणाले. शेतकऱ्यांच्या छोट्या गरजांकडे सरकार लक्ष पुरवत असल्याचं सांगून पीएम-किसान सन्मान निधी अंतर्गत, इथल्या शेतकऱ्यांना 700 कोटी रुपयांहून अधिक रक्कम देण्यात आल्याचं त्यानी सांगितलं.

**<u>इंडिया-आघाडी</u>**

सध्याची लढाई केवळ भाजप आणि काँग्रेस यांच्यात नसून दोन विचारसरणींमधील लढाई असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल एका सभेला संबोधित करताना ते बोलत होते. काँग्रेस - सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर देत असली तरी देश केंद्राने चालवावा अशी सत्ताधारी पक्षाची विचारधारा आहे असं ते म्हणाले.

राहुल गांधी यांनी काल ६३ दिवसांच्या भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप मुंबईतील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक असलेल्या चैत्यभूमी इथ; संविधान प्रस्तावनेच्या वाचनाद्वारे केला. बेरोजगारी, हिंसाचार,

द्वेष, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, अग्निवीर यासारख्या खऱ्या समस्यांकडे प्रसारमाध्यमांद्वारे दुर्लक्ष केलं जात असल्यामुळे  आपल्याला भारत जोडो यात्रा काढावी लागल्याचं इंडिया-आघाडीच्या शिवाजी पार्कवर झालेल्या सभेत त्यांनी सांगितलं.

या सभेत इंडिया-आघाडीचे प्रमुख नेते - राष्ट्रवादी - शरदचंद्र पवार- पक्षाचे  अध्यक्ष शरद पवार, शिवसेना – उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक प्रमुख एम के स्टॅलिन, नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष फारुक अब्दुल्ला, पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

**इलेक्टोरल-बॉंड्स**

सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदणी कार्यालयातून निवडणूक रोखेसंदर्भातील  डिजीटल स्वरूपातील माहिती निवडणूक आयोगानं काल आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित  केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राजकीय पक्षांनी निवडणूक रोख्यांवरील माहिती  सीलबंद पाकिटामध्ये दिल्याचं निवडणूक आयोगाने एका निवेदनात म्हटलं  आहे. राजकीय पक्षांकडून मिळालेली ही माहिती सीलबंद पाकिटं न उघडता सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आली. 15 मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार - सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने  माहितीच्या प्रती आणि पेन ड्राईव्हमधील डिजीटल रेकॉर्ड सीलबंद पाकिटामध्ये परत केलं होतं.

**पुतीन**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी रशियाच्या राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक सलग पाचव्यांदा जिंकत दीर्घकाळ राष्ट्राध्यक्ष पदावर राहण्याचा नवा विक्रम रचला आहे. आपलं निवडणुकीतील यश हे देशाचा माझ्यावर असलेला विश्वास आणि आशेचं प्रतीक आहे अशा शब्दात पुतीन यांनी या विजयाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आतापर्यंत रशियाच्या ८० भागातील मतमोजणी पूर्ण झाली असून त्यामध्ये त्यानुसार ८७% मतदारांनी पुतीन यांना कौल दिला आहे.
या विजयामुळे जोसेफ स्टालिन यांना मागे टाकत पुतीन हे रशियाचं राष्ट्राध्यक्षपद सर्वाधिक काळ भूषविणारे नेते ठरले आहेत. मॉस्कोमध्ये आपल्या विजयाच्या भाषणात बोलताना पुतीन यांनी युक्रेन मध्ये चाललेल्या लष्करी कारवाई संबंधित कामातील अडथळे दूर करण्याला आपण प्राधान्य देण्यार असून रशियन लष्कराला बळकटी देणार असल्याचं सांगितलं.

**स्टार्टअप महाकुंभ**

स्टार्टअप महाकुंभ या भारताच्या स्टार्टअप परिसंस्थेचं भव्य दर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमाला दिल्लीमध्ये आजपासून सुरुवात होत आहे. भारत मंडपम इथं आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम हा कार्यक्रम येत्या २० तारखेपर्यंत सुरु राहणार आहे. या प्रदर्शनपर कार्यक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता, बी2बी, गेमिंग, ई-स्पोर्ट्स, फिनटेक, इन्क्युबेटर्स आणि ॲकसीलरेटर्स इत्यादी क्षेत्र केंद्रित स्वतंत्र दालनं असतील. एवढ्या मोठ्या प्रमाणावर देशाच्या राजधानी मध्ये आयोजित करण्यात आलेला या प्रकारचा हा पहिलाच कार्यक्रम

असल्याचं डीपीआयआयटीचे सचिव राजेशकुमार सिंग यांनी उद्घाटन प्रसंगी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं.
भारतात जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था असून यामध्ये नव्या स्टार्ट अप्सची दररोज मोठ्या प्रमाणावर भर पडते आहे असंही सिंग यांनी यावेळी बोलताना नमूद केलं. दोन हजाराहून अधिक स्टार्टअप्स, ती हजार भावी नवउद्योजक, पन्नास हजार व्यावसायिक, हजारो गुंतवणूकदार आणि ५ हजाराहून जास्त इन्क्युबेटर्स आणि १० देशातील प्रतिनिधी मंडळं या भव्य कार्यक्रमामध्ये सहभागी होणार आहेत.

**<u>इसिस</u>**

राष्ट्रीय तपास संस्था N I A ने काल पुण्यातील ईसीस प्रकरणात चार स्थावर मालमत्ता 'दहशतवादामधून जमवण्यात आलेली संपत्ती' म्हणून जप्त केल्या. जप्त केलेल्या मालमत्ताचा संबंध तीन फरार आरोपींसह 11 आरोपींशी असल्याचं N I A ने एका निवेदनात म्हटलं आहे. या 4 मालमत्ता स्फोटकं बनवणे, त्याचं प्रशिक्षण देणे आणि दहशतवादी कृत्यांच्या नियोजनासाठी केला जात होता असं एनआयएने म्हटलं आहे. आरोपींनी वापरलेल्या या मालमत्ता म्हणजे निवासी घरं आणि सदनिका आहेत. महाराष्ट्र, गुजरात आणि भारताच्या अन्य भागात विविध ठिकाणी हल्ले करून दहशत पसरवण्याच्या ईसीसच्या कटाशी या प्रकरणाचा संबंध असल्याचं N I A नं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>चाचे</u>**

अरबी समुद्रात 40 तास चाललेल्या कारवाईनंतर, भारतीय नौदलाची युद्धनौका INS कोलकाता - 35 पकडलेल्या समुद्री चाच्यांना भारतात आणण्यासाठी सज्ज झाली आहे. भारतीय नौदलाची युद्धनौका INS कोलकाताने 35 समुद्री चाच्यांना ताब्यात घेतलं असून मोठ्या कारवाईनंतर सुटका करण्यात आलेल्या 17 जणांच्या चमूसह त्यांना भारतात आणलं जात असल्याचं नौदलाच्या अधिकाऱ्यांनी काल सांगितलं. या कारवाई दरम्यान, भारतीय नौदलाने समुद्री चाच्यांना शरण येण्यास भाग पाडलं आणि 'एमव्ही रुएन' या व्यापारी जहाजातील 17 जणांची सुटका केली. हे व्यापारी जहाजही भारतात आणलं जात आहे. अरबी समुद्रात तैनात असलेल्या आयएनएस कोलकाताची ही कारवाई अतिशय गतीशीलतेनं आणि सातत्यानं 40 तासांहून अधिक काळ सुरू होती.

**<u>भारत मालदीव</u>**

भारत-मालदीव दरम्यानची उच्च-स्तरीय गाभा गटाची तिसरी बैठक काल माले इथे झाली. यामध्ये मालदीवच्या लोकांना मानवतावादी सेवा पुरवणाऱ्या भारतीय विमान सेवेच्या कामात भारतीय तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या सद्य नियुक्तीचा आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय सहकार्याशी संबंधित व्यापक मुद्द्यांवर चर्चा केल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या अधिकृत पत्रकात म्हटलं आहे.

**<u>पाक-पूल-राजेंद्र</u>**

आर्थिक संकटात असलेला पाकिस्तान दिवाळखोरी टाळण्यासाठी एप्रिल महिन्यात EFF म्हणजे विस्तारित निधी सुविधेच्या अंतर्गत दीर्घ आणि मोठ्या मदत कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला औपचारिक विनंती करणार आहे . प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, आयएमएफ वर्ल्ड बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रेटन वुड इन्स्टिट्यूशन्सची बैठक 15 ते 20 एप्रिल दरम्यान वॉशिंग्टन इथे होणार आहे.

**आइसलँड ज्वालामुखी**

आइसलँडमध्ये, रेकजेनेस द्वीपकल्पात आणखी एका ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर देशाच्या दक्षिण भागात आणीबाणीची स्थिती घोषित करण्यात आली आहे. डिसेंबरपासून हा चौथा ज्वालामुखी उद्रेक असल्याचं आइसलँडच्या हवामान खात्यानं एका निवेदनात म्हटलं आहे. परवा रात्री शक्तिशाली आणि वेगवान ज्वालारसाचा उद्रेक सुरू झाला, परंतु काल सकाळपासून प्रवाह संथ आणि स्थिर आहे.

**WPL**

महिला प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये काल झालेल्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्स संघावर ८ गडी राखून विजय मिळवत, जेतेपद पटकावलं. नवी दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर काल हा सामना पार पडला. दिल्ली कॅपिटल्स संघाचं ११४ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने १९ षटक आणि ३ चेंडूत पूर्ण केलं. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या एलीस पेरी हिनं सर्वांत जास्त ३५ धावा केल्या. त्या पाठोपाठ सोफी डिव्हाईन हिने ३२ तर स्मृती मंधाना हिने ३१ धावा काढल्या. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतलेल्या दिल्ली कॅपिटल्स संघानं १८ षटकं आणि ३ चेंडूत सर्व गडी बाद ११३ धावा केल्या. यामध्ये शेफाली वर्मा हिनं सगळ्यात जास्त, ४४ धावा केल्या. सोफी मोलीन्युक्स या सामन्यातील उत्कृष्ट खेळाडू ठरली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**